आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१६ ऑक्टोबर २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- 2025-26 च्या पणन हंगामासाठी रबी पिकांच्या किमान आधारभूत दरात, तसंच केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय
- दिवाळीच्या काळात पक्ष, इच्छुक किंवा उमेदवारांकडून दिल्या जाणाऱ्या भेटवस्तूंवर काटेकोर लक्ष ठेवणार असल्याचा राज्य निवडणूक आयोगाचा इशारा
- जम्मू-काश्मीर या केंद्रशासित प्रदेशाचे पहिले मुख्यमंत्री म्हणून नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे नेते ओमर अब्दुल्ला यांचा शपथविधी

**आणि**

- नायजेरियात एक इंधनाच्या टँकरचा स्फोट होऊन ९४ जणांचा मृत्यू, ५० जण जखमी

<><><><><>

**२०२५-२६ च्या पणन हंगामासाठी रबी** पिकांच्या किमान आधारभूत दरात वाढ करण्याचा निर्णय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला आहे. यात गव्हाच्या किमान आधारभूत दरात दीडशे रुपये वाढ केल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. तसंच बाजरी १३० रुपये, ज्वारीत १३०, हरभरा २१०, मसूर २७५, मोहरी ३००, आणि सूर्यफूलाच्या किमान आधारभूत दरात १४० रुपये वाढ करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी हा निर्णय घेतल्याचं यावेळी वैष्णव यांनी सांगितलं.

**केंद्रीय सरकारी कर्मचारी** आणि निवृत्ती वेतनधारक महागाई भत्त्यात तीन टक्के वाढ करण्यात आली आहे. याचा लाभ ४९ लाख केंद्रीय कर्मचारी आणि ६४ लाख निवृत्ती वेतनाधारकांना होणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**उत्तर प्रदेशात वाराणसी** इथल्या दीनदयाल उपाध्याय मल्टी ट्रॅकिंग प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. यात गंगा नदीवरल्या रेल्वे आणि रस्ते पुलाच्या बांधकामालाचा समावेश आहे. या प्रकल्पाला २ हजार ६४२ कोटी रुपये खर्च येईल, असं मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

दिवाळीच्या काळात पक्ष, इच्छुक किंवा उमेदवारांकडून दिल्या जाणाऱ्या भेटवस्तूंवर आयोगाचं आणि पोलिसांचं काटेकोर लक्ष असणार आहे. यासंदर्भात सर्वसामान्य नागरिक C-VIGIL ॲपवर तक्रार नोंदवू शकतात, अशी माहिती महाराष्ट्र राज्याचे अतिरीक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी यांनी दिली. मुंबईत आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. निवडणूक जाहीर झाल्यानंतर राज्यात काल काही शासन आदेश जारी झाले असतील किंवा काही जाहिराती प्रसिद्ध झाल्या असतील त्यांची चौकशी करू असंही कुलकर्णी म्हणाले.

या निवडणुकीत उमेदवाराला कमाल ४० लाख रुपये खर्च करता येईल. उमेदवारी अर्ज भरल्यानंतर खर्चाची मोजणी सुरू होईल पण अर्ज भरण्यापूर्वी काही प्रचारसाहित्य खरेदी केलं असेल तर त्याचा खर्चही यात धरला जाईल, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिली. गेल्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत यंदा राज्यात ६९ लाखांहून_अधिक मतदार वाढले आहेत. तसंच मतदान केंद्रांची संख्या साडे ३ हजारांनी वाढल्याचं ते म्हणाले. ४० टक्क्यांपेक्षा अधिक दिव्यंगत्व आणि ८५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना अर्ज भरुन दिल्यावर घरुन मतदानाची सोय मिळेल, असं त्यांनी सांगितलं. मुंबई, पुणे, ठाण्यात गृहनिर्माण संस्थांमध्ये १ हजार १८१ आणि झोपडपट्टीत २१० मतदान केंद्र उभारली आहेत. या निवडणुकीसाठी ६ लाख कर्मचारी आणि पुरेशी सुरक्षा व्यवस्था तैनात केली जाणार आहे.

**<><><><><>**

भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक आज नवी दिल्लीत होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह अनेक वरिष्ठ नेते यात सहभागी होणार आहेत. यावेळी उमेदवार यादीवर चर्चा होण्याची शक्यता आहे.

<><><><><>

महाविकास आघाडीत २८८ पैकी २२४ जागांवर सहमती झाली आहे. उद्या उर्वरित जागांवर सहमती होईल, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली. नवी दिल्लीत पक्षाच्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. आज ८४ जागांच्या उमेदवारांबाबत चर्चा झाल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या आवारातल्या न्यायदेवतेच्या पुतळ्यात बदल करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या नव्या न्यायदेवतेच्या हातात तलवारीच्या ऐवजी राज्यघटना आहे. बळाचा वापर करून नाही, तर न्याय्य पद्धतीनं कायद्याचं राज्य आणणं याचं हे प्रतीक आहे. न्याय पारदर्शक असतो, हा संदेश देण्यासाठी तिच्या डोळ्यांवरची पट्टीही हटवण्यात आली आहे.

<><><><><>

संगीत आणि नृत्याला भाषेची गरज नसल्यानं या कलाप्रकारांना  सीमेचं बंधन नाही. त्यामुळेच हे कलाप्रकार सर्वांना समजू शकतात, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. नवी दिल्लीत भारतीय नृत्यावर आधारीत पहिल्या आंतरराष्ट्रीय महोत्सवात ते बोलत होते. सहा दिवस चालणाऱ्या महोत्सवाचं आयोजन संगीत नाटक अकादमीनं केलं आहे.

युवा वर्गासाठी प्रधानमंत्र्यांनी दिलेल्या संदेशात नृत्याचं महत्त्व सांगितलं. भारतीय संस्कृतीचा नृत्य हा अविभाज्य घटक आहे. युवा वर्गानं अशा उत्सवांत

सहभागी होऊन आपल्या संस्कृतीची जोपासना करावी, असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी केलं.

<><><><><>

जम्मू-काश्मीर या केंद्रशासित प्रदेशाचे पहिले मुख्यमंत्री म्हणून नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे नेते ओमर अब्दुल्ला यांनी आज शपथ घेतली. श्रीनगरच्या शेर-ए-काश्मीर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटरमध्ये झालेल्या कार्यक्रमात नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. अब्दुल्ला यांच्याबरोबर आणखी ५ मंत्र्यांचाही शपथविधी यावेळी झाला. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी, समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे तसंच इंडीया आघाडीतले इतर नेते या समारंभाला उपस्थित होते. <><><><><>

भाजपा नेते नायब सिंग सैनी उद्या सलग दुसऱ्यांचा हरियाणाच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतील. आज दुपारी त्यांनी राज्यपाल बंडारु दत्तात्रेय यांची भेट घेऊन सत्ता स्थापनेचा दावा केला. पंचकुलामध्ये होणाऱ्या या समारंभाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

राष्ट्रपती दौप्रदी मुर्मू तीन देशांच्या दौऱ्यावर असून आज त्या मॉरिटानिया मध्ये दाखल झाल्या आहेत. मॉरिटानियाचे राष्ट्रपती मोहम्मद औलद गजौनी यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. मॉरिटानिया दौऱ्यात राष्ट्रपती तिथल्या भारतीय वंशाच्या नागरिकांची भेट घेणार आहे. तसंच द्विपक्षीय बैठका देखील घेणार आहेत.

<><><><><>

इस्लामाबादमध्ये झालेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत ८ मुद्द्यांवर सर्व देशांमध्ये सहमती झाली. ही बैठक अतिशय फलदायी ठरल्याचं परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य,

डिजिटल सर्वसमावेशन, मिशन लाइफ आणि संयुक्त राष्ट्रांची शाश्वत विकासाठी उद्दिष्ट साध्य करण्याच्या मुद्द्यांवर या देशांमध्ये सहमती झाली. SCO Startup Forum, स्टार्ट अप आणि पारंपारिक औषधांसाठी विशेष कार्यगट स्थापन करण्यावरही या देशांमध्ये सहमती झाली.

<><><><><>

नायजेरियात एक इंधनाच्या टँकरचा स्फोट होऊन ९४ जण मारले गेले तर ५० जण जखमी झाले. टँकरचालकाचं वाहनावरचं नियंत्रण गेल्यामुळे हा टँकर कलंडला होता. त्यातलं इंधन जमा करायला जमलेल्या जमावातल्या बहुसंख्यांचा मृतांमध्ये समावेश आहे. नायजेरियातले इंधनाचे भाव सामान्यांच्या आवाक्याबाहेचे आहेत त्यामुळे असे अपघात अनेकदा घडतात. सप्टेंबरमध्येही इंधनाचा टँकर कलंडून झालेल्या अपघातात ५९ जण मारले गेले होते.

<><><><><>

लेबननच्या नाबतिह शहरावर इस्रायलने आज केलेल्या हवाई हल्ल्यात महापौरासह सहा नागरिकांचा मृत्यू झाला. इस्रायली लष्कराने झेबडीन आणि कफार तेबनीत या भागांवरही हल्ले केले. तर हिजबोल्लाहने उत्तर इस्रायलमधल्या कार्मिएलच्या दिशेने क्षेपणास्त्रं डागली.

<><><><><>

विमानात स्फोट घडवून आणण्याची धमकी दिल्या प्रकरणी एका अल्पवयीन आरोपीला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. १४ ऑक्टोबर रोजी आरोपीने एका बनावट एक्स खात्यावरून चार विमानांमध्ये स्फोट होणार असल्याचं सांगितलं होतं. यात तीन आंतरराष्ट्रीय विमानं होती. धमकीमुळे दोन विमानांना उशीर झाला तर एक विमान रद्द करावं लागलं होतं.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंडमध्ये सुरू झालेल्या कसोटी क्रिकेट मालिकेच्या पहिल्या सामन्यातला पहिल्या दिवसाचा खेळ पावसामुळे रद्द झाला आहे. सकाळी बेंगळुरूच्या चिन्नास्वामी मैदान परिसरात पाऊस असल्याने सामना सुरू व्हायला उशिर झाला होता. दुपारी चहाच्या विश्रांतीपर्यंत पाऊस कायम राहिल्याने आजच्या दिवसाचा खेळ रद्द झाल्याची घोषणा करण्यात आली.

**<><><><><>**

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीत आज भारताच्या उन्नती हूडा हिच्यापुढे अमेरिकेच्या लॉरेन लॅम हिचं आव्हान आहे. दरम्यान, भारताच्या त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीला महिला एकेरीच्या पहिल्याच फेरीत पराभवाला सामोरं जावं लागलं. मलेशियाच्या जोडीनं त्यांना २१-१९, १७-२१, १५-२१ असं नमवलं. मिश्र दुहेरीतही एन. सिक्की रेड्डी आणि बी. सुमीत रेड्डी या जोडीला कॅनडाच्या जोडीनं २०-२२, २१-१९, २४-२२ असं हरवलं. पुरुष एकेरीत सतीश कुमार करुणाकरनला तैवानच्या सू लि यांग याच्याकडून पराभव पत्करावा लागला. तत्पूर्वी, दोनवेळा ऑलिम्पिक पदकविजेती पी. व्ही. सिंधू हिनं महिला एकेरीच्या उप उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.